दिनांक - 19/07/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.51

विषय – नगरपरिषद हद्दीतील सावरकरनगर येथे सुभाष रामचंद्र पाटील घर ते मार्केट यार्ड,स्मशानभूमीकडे जाणा-या रस्त्यापर्यंत पाईप गटर करणे व रस्ता मुरमीकरण आणि खडीकरण करणेबाबत श्री.सुभाष रामचंद्र पाटील यांचे दिनांक 22/06/2022 रोजीचे दाखल अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ – मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दि.12/07/2023 रोजी मंजुर केलेली टिपणी.

सावरकरनगर येथे सुभाष रामचंद्र पाटील घर ते मार्केट यार्ड, स्मशानभूमीकडे जाणा-या रस्त्यापर्यंत पाईप गटर करणे व रस्ता मुरमीकरण आणि खडीकरण करणे या कामाची स्थळपाहणी केली असता सदर ठिकाणी गटर नाही तसेच रस्त्याची सोय नाही, त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. त्या ठिकाणी रस्ता व गटर करणे कामी नागरिकांची वारंवार मागणी होत आहे तसेच श्री.सुभाष रामचंद्र पाटील यांनी दि.22/06/2022 रोजीचे अर्जाने विनंती केली आहे.

सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे

1) कामाचे स्वरूप- (1) 55 MTR लांबीची,300MM रुंद सिमेंट कॉंक्रीट पाईप गटर,

(2) 55 MTR लांबी व रुंदी 6 MTR रस्ता मुरमीकरण,खडीकरण.

2)अंदाजपत्रकीय रक्कम रुपये – 7,21,553/-

तरी सदरचे काम बांधकाम विकास शुल्क योजने अंतर्गत करणेस मंजूरी देत आहे.याकामी तांत्रिक मंजुरी घेणेत यावी. तांत्रिक मंजुरी नंतर पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा